शनिवार, दि. १४ जून २०२५ ● जालना ● वर्ष ६ वे ● अंक ३०९ वा ● किमंत २ रु. ● पाने ०४
8390098886 | yuva.aadarsh@gmail.com | 8390048886

विघ्नहर्ता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल अँण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com
# युवा आदर्श
संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके
https://facebbook.com/yuva.aadarsh/ | https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ | https://twitter.com/Yuva_aadarshjln/ | RNI: MAHMAR/2019/78282

## ढवळेश्वर परिसरात रस्त्यावर शेततळं!





**जालना । प्रतिनिधी -** शहरातील ढवळेश्वर परिसरातील रस्त्यावर मोठ-मोठाले खड्डे पडले असून यात पाणी साचत आहे. परिणामी या रस्त्यावरून मार्गक्रमण करणाऱ्यांना तारेवरची कसरत करावी लागत आहे. महत्त्वाचे म्हणजे एखाद्या शेततळ्याप्रमाणेच याला स्वरुप प्राप्त झाले असल्याने एखाद्या शेतकऱ्याच्या शेतातील शेततळं तर या ठिकाणी बांधल्या गेले नाही ना? अशी शंका उपस्थित होते आहे. नुकतेच अपहार प्रकरणात दहा तलाठ्यांना निलंबित केले असून काहींची चौकशी सुरु आहे. विविध प्रकारे शेतकऱ्यांच्या निधीवर त्यांनी डल्ला मारल्याचा आरोप त्यांच्यावर आहे. त्यामुळे एखाद्या शेतकऱ्याच्या शेतातील शेततळं मंजुर करून ते ढवळेश्वर परिसरात बांधल्या गेले असावे? मात्र, या शेततळ्यामुळे परिसरातील नागरिकांसह या रस्त्यावरून मार्गक्रमण करणाऱ्यांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे.

परिसरातील नागरिकांनी ओरड करूनही याचा काही एक फायदा अद्याप पर्यंत झालेला नाही. मागील तीन वर्षांपासून मनपा प्रशासनासह जिल्हाधिकाऱ्यांना या रस्त्याच्या संदर्भात निवेदने या भागातील सामाजिक कार्यकर्ते सुभाष मामा सले यांच्यासह नागरिकांनी दिले आहेत. असे असले तरी शेतकऱ्यांसह सर्वसामान्यांच्या निधीवर डल्ला मारण्याची मानसिकता असलेल्या अधिकाऱ्यांना नागरि समस्यांशी काही देणं घेणं नसल्याचे आता स्पष्ट होत आहे.

भ्रष्टाचाराने बरबटलेल्या या प्रशासकीय कामकाजाला शिस्त लावण्यासाठी जिल्हाधिकारी यांनी कठोर पाऊले उचलण्याची आवश्यकता आहे. ढवळेश्वर परिसरातील रस्त्यावरील शेततळे योग्य ठिकाणी हलविण्यात येऊन पुन्हा या ठिकाणी रस्त्याचे काम करण्यात यावे अशी मागणी परिसरातील नागरिकांकडून पुन्हा होत आहे. अन्यथा येत्या काळात आंदोलन करण्याचा ईशारा ही या भागातील नागरिकांनी युवा आदर्श बोलतांना दिला आहे.

## शेतकऱ्यांचा संयम संपला; मराठा महासंघ रस्त्यावर उतरणार-देशमुख

### बच्चू कडू यांचे उपोषण व दिलीप राठी यांच्या आंदोलनास पाठिंबा



**जालना । प्रतिनिधी -** एकीकडे अमरावती येथे आमदार बच्चू कडू कर्जमाफीसह शेतकऱ्यांच्या हक्कांसाठी अन्नत्याग आंदोलन करत आहेत, तर दुसरीकडे जालन्यात समृद्धी महामार्गाच्या जमिनीबाबत अन्यायकारक भरपाईविरोधात दिलीप राठींच्या नेतृत्वात ३०० गावातील शेतकरी सव्वा महिन्यापासून आंदोलन करत आहे. तरीदेखील सरकार लक्ष द्यायला तयार नसल्याने, या दोन्ही आंदोलनास मराठा महासंघाने ठाम पाठिंबा दर्शवत, शासनाने याबाबत तातडीने सकारात्मक निर्णय घेतला नाही तर महासंघाची आंदोलनशैली सरकारला परवडणारी ठरणार नाही, असा थेट इशारा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना देण्यात आला आहे.

मराठा महासंघाचे जिल्हाध्यक्ष अरविंद देशमुख यांच्यासह जिल्हा कोषाध्यक्ष अशोक पडूळ, युवक जिल्हाध्यक्ष अ‍ॅड शैलेश देशमुख, जिल्हा समन्वयक लक्ष्मण उढान, जिल्हा उपाध्यक्ष सुभाष चव्हाण, विद्यार्थी आघाडीचे इंजी. शुभम टेकाळे, कामगार जिल्हाध्यक्ष मंगेश मोरे आदींनी शुक्रवार दि. १४ जून रोजी जिल्हाधिकाऱ्यांमार्फत मुख्यमंत्र्यांना पाठवलेल्या निवेदनात म्हटले आहे की, शेतकऱ्यांना कर्जमाफी, विधवा-दिव्यांगांना मानधन, शेतमालाला २० टक्के अनुदान, आत्महत्याग्रस्त कुटुंबांना मदत आदी मागण्यासाठी आमदार बच्चू कडू यांनी अमरावती येथे अन्नत्याग आंदोलन सुरू केलेले असून, त्यांची प्रकृती दिवसेंदिवस खालावत चालली आहे तर दुसरीकडे, जालना येथे समृद्धी महामार्गासाठी बाजारभावाच्या तुलनेत अत्यल्प भरपाईमुळे ३०० गावांतील शेतकरी उध्वस्त होण्याच्या मार्गावर आहेत. या मुद्द्यावर दिलीप राठी यांच्या नेतृत्वाखाली सव्वा महिन्यापासून आंदोलन सुरू आहे. बाधित शेतकऱ्यांनी लेकरा बाळांसह जिल्हाधिकारी कार्यालयावर धडक मारली, आता रस्ता रोकोचे सत्र सुरू झाले आहे. यापूर्वीच आंदोलकांनी सामूहिक आत्मदहनाचा इशारा दिलेला आहे. त्यामुळे त्यांचा संयम सुटत चालला असून, तरीदेखील सरकार झोपेचे सोंग घेत असल्याने संतापाचा उद्रेक होऊ लागला आहे. शेतकऱ्यांना न्याय मिळवून देण्यासाठी आता या आंदोलनाला मराठा महासंघाने पाठिंबा दर्शविला असून, या मुद्द्यावर आम्ही आंदोलन सुरू करणार आहोत. शासनाला जाग येईपर्यंत आम्ही थांबणार नाही, असा खणखणीत इशारा या शिष्टमंडळाने निवेदनात दिला आहे.

## १० तलाठ्यांचे निलंबन

**जालना । प्रतिनिधी -** अनुदान वितरणाच्या अपहरित रकमेबाबत प्राथमिकस्तरावर जिल्हा प्रशासनाने शुक्रवार (दि १३) रोजी १० तलाठीचे निलंबन केले आहे. तसेच इतर तलाठ्यांकडून खुलासे मागविण्यात आले असून या खुलाशानुसार अभिलेख तपासून दोषींवर कारवाई करण्यात येणार असल्याचे जिल्हाधिकारी यांनी कळविले आहे.

युवा आदर्श

### मरणांती ...

मरण आहे अटळ
जाणा वस्तुस्थिती
मरणांती बदलते रे
सगळी परिस्थिती
अंतयात्रेच्या वेळी
भाऊगर्दीचं नुसती
अनोळखी माणसे
जोडू लागती नाती
भाषणे साचेबंद ती
उफाळून येते प्रिती
मुखावरी मुखवटा
बदले प्रमेय भूमिती
गेलेला होता भला
ते विशेषणे लागती
नसलेल्या आठवणी
कसे कुणी सांगती
दिवंगत असा तसा
मिळे नवीन माहिती
त्याच्या सम तोचि
गाती सगळे महती
जळून जाय कलेवर
मातीत मिसळे माती
जाणारा पडद्याआड
सगळे सारे विसरती

**हेमंत मुसरीफ पुणे**
9730306996.

## मी निवडून आल्यानंतरच ड्रायपोर्टचं ९५ टक्के काम झाले

### खासदार कल्याण काळे यांचा दावा, महिन्याभरात ड्रायपोर्ट

**जालना । प्रतिनिधी -** मी निवडून आल्यानंतरच ड्रायपोर्टचं ९५ टक्के काम पूर्ण झाले असल्याचा दावा खासदार डॉ. कल्याण काळे यांनी केला आहे. तसेच आधीची काम ही फक्त निवडणुकीच्या दृष्टिने केवळ उदघाटनां पुरती झाली होती असा टोला देखील त्यांनी विरोधकांना लावला आहे.

खासदार डॉ. कल्याण काळे यांनी शुक्रवार (दि १३) रोजी दुपारच्या सुमारास जालन्यातील ड्रायपोर्ट प्रकल्पाची पाहणी केली. त्यांनतर ड्रायपोर्ट परिसरातील एका रेस्टारंट येथे आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते. यावेळी माजी आमदार कैलास गोरंटयाल, जालना जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष राजाभाऊ देशमुख, वरिष्ठ उपाध्यक्ष राजेन्द्र राख, महिला काँग्रेस कमिटीच्या जिल्हाध्यक्ष श्रीमती नंदाताई पवार, राम सावंत, जि.प.चे माजी सभापती जयप्रकाश चव्हाण, माजी सभापती रामधन कळंबे, बदनापूर काँग्रेस कमिटीच्या अध्यक्ष सुभाष मगरे, जालना पं.स.चे माजी सभापती सोपान तिरुखे, राम शिरसाठ, अरुण पैठणे, विश्वंभर तिरुखे, ज्ञानदेव इंगोले आदी उपस्थित होते.

डॉ. काळे म्हणाले की, माझ्या प्रयत्नामुळे हा प्रकल्प तडीस गेल्यानं दोन महिन्यात जालन्यातील ड्रायपोर्ट प्रकल्प सुरु केवळ दोनच महिन्यात सुरु होणार असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले.

खासदार डॉ. कल्याण काळे यांनी जालना ड्रायपोर्टचा पाहणी दौरा करून तेथील कामाचा सविस्तर आढावा घेतला यावेळी ड्रायपोर्टचे सिद्धेश बियाणी जालन्याचे उपविभागीय अधिकारी श्री हदगल जालना तालुक्याच्या तहसिलदार श्रीमती छाया पवार हजर होत्या यावेळी चौकशीत असे सांगण्यात आले कि, ड्रायपोर्टचे सर्व परवाने मिळवण्याची प्रक्रिया जवळपास पूर्ण झालेली आहे व येत्या दोन महिन्यात येथे प्रत्यक्ष काम काजाला सुरुवात होईल असे सांगण्यात आले.



मागील एक वर्षाच्या कामाचा आढावा खा. डॉ. काळे यांनी पत्रकार परिषदेत मांडला. त्यात प्रामुख्याने ड्रायपोर्ट, रेल्वे विभाग, भारत संचार निगम लि. (BSNL) अंबड बायपास तसेच मागील १० वर्षापासून भोकरदन व जाफ्राबाद तालुक्यातील MRGS अंतर्गत मिळणाऱ्या विहिरींचा लाभ शेतकऱ्यांना मिळत नव्हता तो दिशा समितीच्या बैठकीत मुद्दा घेऊन सदर शेतकऱ्यांना ह्या योजनेचा लाभ देण्याचे संबंधित यंत्रणेला आदेशित करण्यात आले. व पान २ वर




## उघड्या रोहित्रामुळे वीजेचा शॉक लागून गायींचा मृत्यू

### बजरंगदलच्या वतीने महावितरणला निवेदन; सुरक्षिततेच्या दृष्टिने उपाया योजना आखाण्याची मागणी

**जालना । प्रतिनिधी -** शहरातील बालाजी नगर भागात रोहित्रामुळे वीजेचा शॉक लागल्याने गायी मरण पावल्याची दुर्देवी घटना शुक्रवार (दि १३) पहाटे उघडकीस आली आहे. उघड्या असलेल्या रोहीत्रा मुळे ही घटना घडल्याचे प्राथमिक दिसून येत आहे. यापुर्वीदेखील तार पडल्याने गायींचा मृत्यू झालेला आहे. भविष्यात अशा घटना घडू नये यासाठी महावितरणने उपाययोजना कराव्यात अशी मागणी जोर धरू लागली आहे.

या घटनेनंतर बजरंग दल च्या वतीने शुक्रवार रोजी दुपाराच्या सुमारास शहरातील उघड्या रोहीत्राबाबत महावितरणला निवेदन देण्यात आले आहे.

दिलेल्या निवेदनात नमूद करण्यात आले की, शुकवार (दि १३) व मागील आठवड्यात महावितरणच्या गलथान कारभारामुळे ३ ते ४ गायी दगावल्या आहेत. पावसाळ्याचे दिवस असुन सुद्धा महावितरण कर्मचाऱ्याकडुन कोणत्याही प्रकारचे उघड्या असलेल्या रोहित्रला सुरक्षिततेच्या दृष्टिने उपाय योजना करण्यात आलेली नाही. उघडे रोहित्र हे मुक्या जनावरासाठी धोक्याचे ठरत आहे. महावितरणाच्या दुर्लक्षित असलेले डिपी मुळे जनावरांसोबत माणसांचे ही जीव धोक्यात आले आहे. रस्त्यावर लहान मुले खेळत असतात. अशा वेळी त्यांच्या जीवाला सुद्धा धोका नाकारता येत नाही. महावितरणच्या गलथान कारभारासाठी त्यांना पुरस्कृत करावे अशी उपरोधिक इच्छा त्यांनी व्यक्त केली. महावितरणने आपली जबाबदारी समजून भविष्यात कोणतीही जीवितहानी होऊ नये व अनुचित घटना घडू नये या साठी लवकरात लवकर संपूर्ण



शहरातील उघड्या रोहीत्रांना तटबंदी व कंपाऊंड असलेले सुरक्षीततेचे उपाय करावे अन्यथा बजरंग दलातर्फे आपल्या कार्यालयासमोर मोठे आंदोलन करण्यात येईल .असा ईशारा निवेदनाद्वारे देण्यात आला.

# संपादकीय पान

## रक्तदान सर्वश्रेष्ठ दान!

आजचा दिवस संपूर्ण जगात जागतिक रक्तदान दिन म्हणून साजरा केला जातो. ऑस्ट्रेलियातील डॉ कार्ल लॅडस्टेनर या संशोधकाच्या स्मृतिप्रीत्यर्थ हा दिवस जागतिक रक्तदाता दिन म्हणून साजरा केला जातो. १४ जून हा त्यांचा जन्मदिन आहे. डॉ कार्ल लॅडस्टेनर यांनी 'एबीओ' हा नवा रक्तगट शोधून काढला त्यांच्या या संशोधनासाठी त्यांना नोबेल पारितोषिक मिळाले होते. पहिला जागतिक रक्तदाता दिन २००५ साली साजरा झाला होता. त्यानंतर दरवर्षी हा दिवस साजरा केला जातो. प्रत्येक वर्षी एक सूत्र घेऊन हा दिवस साजरा केला जातो. माता सुरक्षा, रक्तदान श्रेष्ठ दान, डोनेट प्लेटलेट्स यासारखे सूत्र घेऊन त्याची माहिती या दिवशी दिली जाते. रक्तदानाचे आवाहन केले जाते. जागतिक आरोग्य संघटनेने घोषित केलेल्या या दिवसाच्या साजरीकरणात रेड क्रॉस सोसायटीचा हिरीरीने भाग असतो. कौन्सिल ऑफ युरोप ही संघटना देखील रक्तदाना संदर्भात मोठ्या प्रमाणात जनजागृती करते. आपल्या देशात देखील विविध शासकीय, सामाजिक, सेवाभावी संस्था या दिवसाचे आयोजन करून लोकांमध्ये रक्तदाना संदर्भात जनजागृती करतात. या दिवशी रक्तदात्यांच्या सन्मान केला जातो. रक्तदान शिबिराचे आयोजन केले जाते. रक्तदान श्रेष्ठ दान असं म्हटलं जातं कारण या दानामुळे माणसाचा जीव वाचतो. सुरक्षित रक्त ही अलीकडची वैश्विक समस्या निर्माण झाली आहे. दरवर्षी ९ कोटी युनिटपेक्षा अधिक रक्त दान केले जाते तरीही रक्ताचा तुटवडा जाणवतो. अपघातग्रस्त व्यक्ती, शस्त्रक्रिया झालेले व्यक्ती, रक्तातील त्रुटी असलेले व्याधीग्रस्त व्यक्ती, बाळंतपणात होणारे मातांचे मृत्यू आणि कुपोषण, विविध प्रकारचे बाळ मृत्यू, साथीचे आजार अशावेळी रक्ताची खूप गरज पडते. कोरोना काळात तर रक्ताचा कसा अभूतपूर्व तुटवडा जाणवला होता हे आपण पाहिलेच आहे. कोरोना काळात रक्तदान शिबिरे बंद असल्याने देशात रक्तदानाचा अभूतपूर्व असा तुटवडा जाणवला होता. रक्ताच्या तुटवड्यामुळे अनेक शस्त्रक्रिया पुढे ढकलाव्या लागल्या होत्या. पंतप्रधान आणि मुख्यमंत्री महोदयांनी नागरिकांना रक्तदान करावे असे आव्हान केले होते. भविष्यातही रक्ताचा असा तुटवडा निर्माण होऊ शकतो. आपल्या रक्तामुळे कोणाचा तरी जीव वाचतो. म्हणूनच रक्तदानाला सर्वश्रेष्ठ दान असे म्हणतात. रक्तदानाच्या रूपाने आपण मानवतेला एक मोठी देणगी बहाल करतो. रक्तदान केल्याने कोणतीही इजा किंवा दुष्परिणाम होत नाही. मनुष्याच्या शरीरात ५ लिटर रक्त असते आणि रक्तदानात केवळ ३५० मिली इतकेच रक्त घेतले जाते त्यामुळे कोणतीही कमजोरी जाणवत नाही. विशेष म्हणजे २४ ते ४८ तासात जेवढे रक्त आपण दान दिले आहे तेवढे पूर्ववत होते. त्यामुळे प्रत्येक व्यक्तीने पुढे येऊन रक्तदान केले पाहिजे. रक्तदान सर्वश्रेष्ठ दान असे म्हणून प्रचार होत असला तरी आपल्याकडे रक्तदात्यांची संख्या खुपच कमी आहे. भारतात फक्त ०.६ टक्केच लोक रक्तदान करीत असतात. १३० कोटी लोकसंख्येच्या देशात हे प्रमाण खूप कमी आहे त्यामुळे देशात रक्ताची खूप कमतरता भासते त्यात कोरोना सारख्या महामारीत तर अभूतपूर्व परिस्थिती निर्माण होते. अपघातातील रुग्ण, प्रसव काळ, अतिदक्षता विभाग, तातडीच्या शस्त्रक्रिया अशा वेळी रक्ताची गरज निर्माण होते जर रुग्णांना वेळीच रक्त मिळाले नाही तर त्यांचा मृत्यूही होऊ शकतो त्यामुळे प्रत्येकाने सजग राहायला हवे. आपल्या रक्तामुळे कुणाचा तरी प्राण वाचणार आहे. रक्तदान म्हणजे जीवनदान, रक्तदान सर्वश्रेष्ठ दान हे लक्षात घेऊन प्रत्येकाने रक्तदान करायला हवे.

**श्याम ठाणेदार,**
**दौंड जिल्हा पुणे, ९९२२५४६२९५**

### पान १ वरुन

## मी निवडून ...

आता सन २०२४-२५ मध्ये भोकरदन तालुक्यात ४०३४ शेतकऱ्यांना व जाफ्राबाद तालुक्यात ३४० शेतकऱ्यांना सदर योजनेचा लाभ देण्यात आला. शेतकऱ्यांना खते वेळेवर मिळण्यासाठी संबंधित यंत्रणेची बैठक घेऊन सूचना करण्यात आल्या. ICT इन्स्टिट्यूट ऑफ केमिकल टेक्नोलॉजी कॉलेजची आढावा बैठक घेऊन सदरील कॉलेज मार्फत जालना शहरातील स्टील कंपन्यानमुळे व MIDC मधील प्रदूषणावर कायमस्वरूपी उपाय काढण्यासाठी प्रोजेक्ट सादर करण्याच्या सूचना केल्या तसेच शेतकऱ्यांच्या मोसंबी वर मोसंबी जूस वर प्रक्रिया करून ती जास्त दिवस कशी टिकवता येईल तसेच शेतकऱ्यांचे पिक काढणी नंतर वेस्ट जाणारे मटेरियल वर प्रक्रिया करून शेतकऱ्यांना दोन पैसे कसे जास्तीचे मिळतील यावर कांम करण्यास सांगितले. तसेच सदर प्रोजेक्ट साठी लागणारी आर्थिक मदत मिळवून देण्याची खात्री दिली. CCI मार्फत कापूस खरेदी केंद्रे सुरु करण्यासाठी व सदर केंद्रांना मुदतवाढ देण्यासाठी पाठपुरावा केला. जालना जिल्ह्यातील बँकांना २०२५-२६ खरीप हंगामासाठी जिल्ह्याचा एकूण पीक कर्ज वाटप लाक्षांक रु १३२० करोड एवढा निश्चित करण्यात आला आहे. यात जिल्ह्यातील विविध बँकांचा १८८ शाखांचा समावेश असून, शेतकऱ्यांना पीककर्ज वाटप करण्यात बँकांकडून अनेक प्रकारे शेतकऱ्यांची अडवणूक करण्यात येते त्याबाबत शेतकऱ्यांच्या अडचणी दूर करण्यासाठी व शेतकऱ्यांना वेळेत पीककर्ज उपलब्ध होण्यासाठी खासदार डॉ. काळे यांच्या मार्फत हेल्पलाईन क्रमांक ९७६५९७४५०६ देण्यात आला व पीककर्ज मिळवण्यात शेतकऱ्यांना कोणतीही अडचण आली तर जालना जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी सदरील क्रमांकावर संपर्क साधावा असे आवाहन खासदार डॉ.कल्याण काळे यांनी केले. तसेच BSNL मार्फत जि.प. शाळेतील दत्तक विद्यार्थी योजनेवर खासदार डॉ. काळे यांनी प्रकाश टाकला, सदरील योजनेबाबत प्रत्येक जि.प. शाळेतील किमान ५ विद्यार्थी दत्तक घेऊन त्यांची इंटरनेटची फीस BSNL कडे जमा केल्यास सदरील जि.प. शाळेस BSNL मार्फत इंटरनेट जोडणी देण्यात येते.

# विमान अपघात की घातपात?

अहमदाबाद येथे काल विमान पडून मृत्युमुखी पडलेल्या सर्व बंधू भगिनींनी, बालकांना श्रद्धांजली अर्पण करून, या बाबत मी माझे विचार मांडत आहे. मुळातच काल झालेला विमान अपघात, हा अपघातच आहे की घातपात आहे ? असा प्रश्न माध्यमांवरील दृश्ये पाहिल्यापासून भेडसावत आहे.

या अपघाताबद्दल विविध मान्यवरांनी दुखवटा व्यक्त केला आहे. या अपघाताची चौकशी करण्यात येईल, असे नागरी विमान उड्डाण मंत्री राम मोहन नायडू यांनी कालच जाहीर केले आहे. अपघातातील मृतांच्या कुटुंबियांना मदतही जाहीर करण्यात आली आहे. आता हे विमान बनविणाऱ्या बोईंग कंपनीसुद्धा विमान पडण्याच्या कारणांचा शोध घेईलच. काही तांत्रिक अडचणी लक्षात आल्या तर त्या पुढच्या मॉडेल मधून ते काढून टाकतीलच. या सर्व बाबी म्हणजे स्टँडर्ड ऑपरेशनल प्रोसिजर (SOP) चा भागच आहे. आणखी दोनचार दिवस लोक हळहळ करतील आणि पुन्हा जग रहाटी सुरू होईल. नव्हे ती कालपासूनच सुरूही झाली आहेच.

विमानाचा हा काही पहिलाच अपघात नाहीय आणि कालचा अपघात हा शेवटचाच असेल, असा दावाही कुणी करू शकणार नाही. पण मुळातच खरा शोध घेण्याची गरज ही आहे की, हा अपघातच होता की घातपात होता ?

हा प्रश्न पडण्याचे प्रमुख कारण म्हणजे, जगाला आणि विशेषतः भारताला गेली अनेक वर्षे दहशतवादाने ग्रासले आहे. हा दहशतवाद प्रत्यक्ष/अप्रत्यक्ष पाकिस्तान पुरस्कृत आहे हे देखील जगजाहीर आहे. त्यामुळे अशा प्रकारे घातपात घडवून आणून भारताचे विमान पाडण्याचा नवा दहशतवादी प्रकार



तर नाही ना ? याचा भारतीय गुप्तचर यंत्रणांनी शोध घेतला पाहिजे. अजून पर्यंत तरी कोणत्याही दहशतवादी संघटनेने विमान पाडण्याची अधिकृत जबाबदारी स्वीकारलेली नाही. पण त्यामुळे असे झालेच नसेल ? असेही म्हणता येत नाही. त्यामुळेच विविध देशांतील गुप्तचर संस्थांनी एकत्र येऊन या दृष्टीने देखील शोध घेतला पाहिजे. तसेच हा घातपाताचा प्रकार असेल, तर तो पुन्हा घडणार नाही, याची कठोरपणे दक्षता घेतली जाईल असे पाहिले पाहिजे. तरच जगभरातील प्रवासी निर्धोकपणे, निश्चिंतपणे विमान प्रवास करू शकतील. नाही तर मुंबईत कितीही नैसर्गिक, मानवनिर्मित आपत्ती निर्माण झाल्यावर नाईलाजानेच लोकं कामाला लागतात आणि त्यांची हतबलता लक्षात न घेता, उलट त्यालाच मुंबई स्पिरिट म्हणून गौरवितात, तसेच गरजेपोटी, नाईलाजानेच लोकं विमान प्रवास करीतच राहतील आणि हे त्यांचे स्पिरिट म्हणून गौरविले जाईल. याबाबतीत तरी तसे होऊ नये, अशी अपेक्षा आहे.

**देवेंद्र भुजबळ, ९८६९४८४८००**

# पु.ल.देशपांडे; महाराष्ट्राचे लाडके व्यक्तीमत्व

पुरुषोत्तम लक्ष्मण देशपांडे म्हणजेच पु ल देशपांडे हे महाराष्ट्रातील लोकप्रिय व्यक्तिमत्व होते .अनेक क्षेत्रात त्यांनी लोकप्रियता मिळाली होती. ते विनोदी लेखक होते, संगीतकार होते, गायक, अभिनेते, चित्रपट निर्माते, नकलाकार,दिग्दर्शक, अशा सर्व क्षेत्रात त्यांनी नावलौकिक मिळवला होता पु.ल .म्हणून त्याची ओळख होती. त्यांना भाई सुद्धा म्हणायचे.



पार्ले टिळक विद्यालय मुंबई, पुण्याचे फर्गुसन महाविद्यालय, सांगलीच्या विलिंग्डन महाविद्यालयात त्यांचे शिक्षण झाले. मुंबईला सरकारी कॉलेजमधून त्यांनी एल.एल.बी. केले व पुण्याला आल्यानंतर फर्ग्युसन कॉलेजमधून बी.ए व एम.ए केले. काही काळ त्यांनी कलेक्टर ऑफिस व प्राप्तिकर विभागात नोकरीही केली.

वाचना व्यतिरिक्त त्यांना संगीताचीही आवड होती. अनेक लोकांच्या वागण्यातील विसंगती ते अचूक टिपत असत. आणि नकला करायचे. अनेक व्यक्तिचित्रे त्यांनी आपल्या लिखाणातून रेखाटले होते. खाण्याच्या बाबतीतही पु.ल. शौकीन होते.

फर्ग्युसन महाविद्यालयात असताना त्यांनी नाटकातून भूमिका करायला सुरुवात केली. १९४७ ते ५४ या काळात त्यांनी चित्रपटांमध्ये काम केले. वंदे मातरम, गुळाचा गणपती, या चित्रपटाने अष्टपैलू कामगिरी केली होती. गुळाचा गणपती या चित्रपट त्यांनी कथा, पटकथा, गीत, संगीत, भूमिका, आणि दिग्दर्शन हे सर्वच केले होते. पु. ल. देशपांडे यांचा देवबाप्पा हा चित्रपट खूप प्रसिद्ध झाला. त्यातील नाच रे मोरा.. हे गाणे अजूनही तितकेच प्रिय आहे.

गुळाचा गणपती'मधील 'इंद्रायणी काठीं' ह्या भीमसेन जोशींनी लोकप्रिय केलेल्या गाण्याचे संगीत पु.ल. देशपांडे यांचे होते.

तसेच पुढचे पाऊल या चित्रपटातील भूमिका अतिशय गाजली. कृष्णा महाराची भूमिका त्यांनी केली होती संगीतकार म्हणून गुळाचा गणपती ,चोखामेळा, देव पावला, देव बाप्पा ,अंमलदार, मोठी माणसे, अशा चित्रपटांचे संगीत दिग्दर्शन केले. १९९५ मध्ये पु.लं. आकाशवाणीत नोकरीला लागले त्या काळात त्यांनी अनेक श्रुतिका लिहिल्यात. प्रमुख नाट्यनिर्माते झाले.मोठी माणसे ,पुढचं पाऊल, देव पावला, वंदे मातरम ,भाग्यरेषा, नवरा बायको, घरोघरी ,गुळाचा गणपती ,अंमलदार ,फुल और कालिया ,आज कल ,अशा अनेक चित्रपट कथा पटकथा अभिनय संगीत या माध्यमातून दिग्दर्शन या माध्यमातून कार्य केले.

अपूर्वाई, असा मी असामी, खिल्ली, खोगीरभरती, गणगोत, गोळा बेरीज, बटाट्याची चाळ ,पूर्वरंग,व्यक्ती आणि वल्ली अशा त्यांच्या उल्लेखनीय साहित्यकृती आहेत. बटाट्याची चाळ ,वाऱ्यावरची वरात हे गाजलेले एक पात्री प्रयोग. तीन पैशाचा तमाशा, तुझे आहे तुझ्यापाशी, वट वट, ती फुलराणी, अंमलदार, अशी काही नाटक आहे.

१९६५ ला व्यक्ती आणि वल्ली साठी साहित्य अकादमी पुरस्कार १९६७ मध्ये संगीत नाटक अकादमी पुरस्कार, ८७ ला कालिदास सन्मान, पद्मश्री, पद्मभूषण ,महाराष्ट्र भूषण, महाराष्ट्र गौरव,पुण्यभूषण, अशा अनेक पुरस्काराने त्यांचा सन्मान करण्यात आला. भारत सरकारने त्यांचे सन्मानार्थ पोस्टाचे टपाल तिकीट प्रकाशित केले. त्यांच्या सन्मानार्थ मुंबईला पु ल देशपांडे कला अकादमीची स्थापना झाली.नटसम्राट बालगंधर्व यांच्या स्मृतीची जपणूक व्हावी म्हणून पु ल देशपांडे यांच्या संकल्पनेतून,आणि मार्गदर्शना खाली पुण्याला बालगंधर्व रंग मंदिराची उभारणी झाली. दूरदर्शनच्या पहिल्या प्रसारणासाठी दूरदर्शनवर पंडित नेहरूंची मुलाखत घेणारे पु ल देशपांडे हे पहिले मुलाखतकार होते. साहित्य अकादमी संगीत नाटक अकादमी या दोघांचे पुरस्कार मिळवणाऱ्या मोजक्या प्रतिभावंत साहित्यिकात पु.लंचा समावेश होतो.

१९५८मध्ये पुलंना आकाशवाणीने युनेस्कोच्या शिष्यवृत्तीवर

मीडिया ऑफ मास कम्युनिकेशन या अभ्यासक्रमासाठी लंडनला बीबीसीकडे पाठवले. १९५९मध्ये पु.ल. देशपांडे भारतातील पहिले दूरचित्रवाणी कार्यक्रम निर्माते झाले. दिल्ली दूरदर्शन सुरू झाले त्यावेळचा पहिला कार्यक्रम पुलंनी निर्मिला होता. दूरदर्शनवरील बिरजू महाराजांच्या नृत्याचा कार्यक्रम होता. संथ गतीत सुरू झालेल्या नृत्याची लय वाढत वाढत चौपट झाली. अश्या वेळी त्या द्रुतगतीतही तबला वाजवून पुलंनी आपले तबला प्रावीण्य दाखवून दिले.

पु.लं वर अनेक लेखकांनी पुस्तके लिहिलीत, जसे पु.ल. एक साठवण -जयंत दळवी, पु.ल. चांदणे स्मरणाचे- मंगला गोडबोले, पु.ल नावाचे गारुड- संपादन मुकुंद टाकसाळे, विस्मरणापलीकडले पु.ल. गंगाधर महांबरे.

दिलखुलास व्यक्तिमत्त्व असलेल्या पु ल देशपांडे यांनी संगीत गीत गायन अभिनय दिग्दर्शन निर्मिती लिखाण संवाद पटकथा कुठलेही क्षेत्र सोडले नाही हे विशेष !! म्हणून त्यांच्या अनेक कलाकृतीच्या बाबतीत सब कुछ पु.ल असे म्हटले जाते.

पु.ल.देशपांडे यांचे १२ जून २००० रोजी पुणे येथे पार्किन्सन्सच्या आजाराने निधन झाले. तेव्हा ते ८० वर्षांचे होते. हा दिवस म्हणजे त्यांच्या लग्नाचा ५४ वा वाढदिवसही होता.त्यांच्या स्मृतिदिनी त्यांना ही शब्दरूपी आदरांजली.

**दिलीप देशपांडे.**
**जामनेर. जि.जळगांव**
**मोबा.८९९९५६६९१७**

# आठ दिवसात अधिकारी व कर्मचाऱ्यांनी मुख्यालयी राहून कामे करावीत

### नसता २० जून पासून अन्नत्याग उपोषण करणार - भाऊसाहेब मुके

**परतूर । प्रतिनिधी** - तालुका हे प्रशासनाचे मुख्य केंद्र असते. येथे जमिनीचे रेकॉर्ड, महसूल, आणि इतर प्रशासकीय कामांचा समावेश असतो. शासकीय कार्यालयातील अधिकारी आणि कर्मचारी यांना त्यांच्या नेमणुकीच्या ठिकाणी, म्हणजे मुख्यालयात राहणे बंधनकारक आहे, असे अनेक वर्षांपासूनचे नियम आहे. या नियमाचे पालन करणे आवश्यक आहे, कारण त्यामुळे ग्रामीण भागातील विकास, शिक्षण, आरोग्य सेवा इत्यादींवर सकारात्मक परिणाम होतो. शासनाने यासंदर्भात विविध नियम आणि निर्णय घेतले आहेत, ज्यामध्ये अधिकाऱ्यांनी आणि कर्मचाऱ्यांनी मुख्यालयी राहणे आवश्यक असल्याचे नमूद केले आहे. मुख्यालयी राहण्याने सरकारी कर्मचारी त्यांच्या कामाच्या ठिकाणी अधिक सक्रियपणे काम करू शकतात, ज्यामुळे कामकाजात सुधारणा होते. शासकीय कार्यालयातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी या नियमाचे पालन करणे आवश्यक आहे. मुख्यालयी न राहिल्यास, कर्मचाऱ्यांवर योग्य ती कारवाई होणे अपेक्षित आहे.

दि. ११ जून रोजी तहसील कार्यालयामधील ये-जा करणाऱ्या अधिकारी व कर्मचारी यांची माहिती घेतली असता तहसील मधील ९०% अधिकारी व कर्मचारी हे परभणी, सेलू, जालना व छत्रपती संभाजीनगर येथून ये-जा करत आहेत असे निदर्शनास आले आहे. हा प्रकार धक्कादायक आहे. संजय गांधी निराधार योजनेचे काम ज्या कार्यालयात होते ते जनकल्याण कक्ष सकाळी ११ वाजे पर्यंत बंद होते. या कार्यालयाला कुलूप दिसून आले. या कार्यालयासमोर वयोवृद्ध महिला पुरुष सकाळी १० वाजल्यापासून ताटकळत बसलेल्या आढळून आल्या. तसेच तहसील कार्यालयातील अनेक खुर्च्या या खाली दिसून आल्या. परतूर ला ११ वाजेच्या दरम्यान परभणी व छत्रपती संभाजी नगर वरून रेल्वे आल्यानंतर संबंधित अधिकारी दिसून आले. म्हणजे सद्या परतूर मधील जवळपास सर्वच शासकीय कार्यालयातील कामकाज हे रेल्वे वेळापत्रकानुसार सुरु आहे म्हणून त्यामुळे येत्या आठ दिवसात अधिकारी व कर्मचाऱ्यांनी मुख्यालयी राहून कामे करावीत. नसता २० जून पासून अन्नत्याग आमरण उपोषण करणार असे निवेदन भाऊसाहेब पाटील मुके यांनी जिल्हाधिकारी जालना यांना उपविभागीय अधिकारी, परतूर यांच्या मार्फत सादर केले आहे.

निवेदनात पुढे म्हटले आहे की, राज्यभर शासकीय कार्यालयात बायोमेट्रिक आहे मात्र परतूर मधील कोणत्याच कार्यालयात बायोमेट्रिक चा वापर होताना दिसून येत नाही. म्हणून असे प्रकार होत आहेत. तसेच उपविभागीय कार्यालय, पंचायत समिती, पोलीस स्टेशन, आरोग्य विभाग, कृषी विभाग, शिक्षण विभाग, भूमीअधिलेख तसेच सार्वजनिक बांधकाम विभाग, या व्यतिरिक्त, बँक, पोस्ट ऑफिस, आणि इतर शासकीय कार्यालये आहेत. या सर्व शासकीय कार्यालयामधील अधिकारी व कर्मचारी हे मुख्यालयी राहणे बंधनकारक असूनही जवळपास ७० ते ९० टक्के इतरत्र राहून ये-जा करत आहेत. असे निदर्शनास आलेले आहे. त्यामुळे तालुक्यातील जण - सामान्य नागरिक त्रस्त आहेत.

म्हणून तालुक्यातील सर्व शासकीय कार्यालयातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी येत्या आठ दिवसात मुख्यालयीच निवासाची व्यवस्था करून वेळेवर कामकाजास सुरुवात करावी. त्यामुळे बस करा आता महोदय बाहेरून येणे-जाणे, तुमच्यामुळे जनतेची कामे होताय जीव घेणे या आशयाखाली १) सर्व कार्यालयात बायोमेट्रिक पद्धत सुरु करा. २) शहरा बाहेर राहणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांना मुख्यालयी निवासी राहणे बंधनकारक करा. ३) कार्यालयीन कामकाज करत असताना गळ्यात ओळखपत्र बाळगा. ४) कार्यालयात आलेल्या जण सामान्य नागरिकांना सन्मानाने वागणूक द्या. ५) कार्यालयात येणाऱ्या जाणाऱ्या ची नोंद करत रहा (कारण काही दलाल दिवसभर कार्यालयात दिसून येतात ) आदी मागण्या आठ दिवसात मंजूर करा नसता दि. २० जून २०२५ पासून उपविभागीय कार्यालय, परतूर समोर बेमुदत आमरण उपोषण करणार असा इशारा सामाजिक कार्यकर्ते भाऊसाहेब मुके यांनी दिला आहे.

# बच्चू कडू यांच्या आंदोलनातील मागण्या तात्काळ मान्य करा

### सकल दिव्यांग सामाजिक संघटनेचे मुख्यमंत्र्यांना निवेदन



**जालना । प्रतिनिधी** - प्रहार दिव्यांग क्रांती आंदोलनाचे अध्यक्ष तथा माजी दिव्यांग कल्याण मंत्री ओमप्रकाश उर्फ बच्चू कडू यांच्या बेमुदत अन्नत्याग आंदोलनातील मागण्या तात्काळ मान्य करण्यात याव्यात अशी मागणी सकल दिव्यांग सामाजिक संघटनेच्यावतीने मुख्यमंत्र्यांकडे जालना जिल्हाधिकार्यांमार्फत करण्यात आली आहे.

दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या मौजे माझी येथील समाधी स्थळासमोर ओमप्रकाश उर्फ बच्चू कडू यांचे अन्नत्याग आंदोलन करत आहेत. या आंदोलनात दिव्यांग विधवा महिलांना आंध्रप्रदेशच्या धर्तीवर ६००० मानधन तात्काळ लागू करण्यात यावे व आपल्या संकल्पनेनूसार शेतकर्यांना संपूर्ण कर्जमाफी देण्यात यावी, एमएसपी (हमीभाव) वर २० टक्के अनुदान द्यावे,दि ७ एप्रिल २०२५ रोजी झालेल्या बैठकीच्या इतिवृत्ताप्रमाणे शासन निकाढण्यात यावे, व युवकांच्या हाताला काम दयावी नाही तर सन्मानजनक दाम देण्यात यावे. तसेच रिक्त जागा तातडीने भरण्यात यावेत व अनुदान दयावे., दिव्यांगयाना सरसगट व (विनाअट) घरकुल देण्यात यावे., दिव्यांग वित्त महामंडलाचे दिव्यांग बंधु भगीनीने घेतलेले कर्ज सरसगट माफ करण्यात यावे., ग्रामपंचायतच्या धर्तीवर नगर परिषद महानगरपालीका व नगर पंच्यायत दिव्यांग बंधु भगी घरपट्टी नळ पट्टी माफ करण्यात यावी., दिव्यांग वित्तमहामंडलाचे २ जामीन दाराची अट रद्द करण्यात यावी., दिव्यांग बचत गटाना (महानगरपालीका) विना अट २०००० अनुदान देण्यात यावे. या मागण्यांचा समावेश आहे. या मागण्या त्वरीत मान्य करण्यात याव्यात व बच्चू कडू यांचे अन्न त्याग उपोषण सोडवावे, अशी मागणी संघटनेच्यावतीने करण्यात आली आहे.

निवेदनावर सकल दिव्यांग सामाजिक संघटनेचे संस्थापक अध्यक्ष शंकर शिरगुळे, जालना जिल्हाध्यक्ष राहुल मुळे यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# शिक्षण हीच खरी संपत्ती आहे, जी कधीच नष्ट होत नाही - आमदार बबनराव लोणीकर

## आष्टीत विघ्नहर्ता सेवाभावी संस्था संचलित व्हिजन हॅली पब्लिक स्कूलचा आमदार लोणीकर यांच्या हस्ते शुभारंभ

**परतूर । प्रतिनिधी -** शिक्षण हा मानवी जीवनाचा आधारस्तंभ आहे. तो व्यक्तीला सक्षम बनवतो, समाजाला प्रगतीपथावर नेत असतो आणि राष्ट्राच्या विकासाला गती देतो. शिक्षणाशिवाय प्रगती अशक्य आहे, आणि म्हणूनच प्रत्येक व्यक्तीला शिक्षणाचा हक्क मिळायलाच हवा. या विचाराला केंद्रस्थानी ठेवून, विघ्नहर्ता सेवाभावी संस्था संचलित व्हिजन हॅली पब्लिक स्कूल चा भव्य शुभारंभ सोहळा शुक्रवार, दिनांक १३ जून २०२५ रोजी दुपारी १२ वाजता आष्टी येथे संपन्न झाला. या सोहळ्याचे उद्घाटन परतूर विधानसभा मतदारसंघाचे लोकप्रिय आमदार आणि महाराष्ट्राचे माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर यांच्या शुभहस्ते झाले. यावेळी विद्यार्थी, पालक, स्थानिक नागरिक आणि मान्यवरांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. या प्रसंगी व्यासपीठावर वेदाचार्य कस्तुरे गुरुजी, डॉ. सुरेश साबळे, संस्थापक अध्यक्ष - शंकर गंगथरे, प्राचार्य - गजानन कासतोडे, भाजपा तालुका अध्यक्ष परतूर शत्रुघन कणसे, अनंतराव जिजा यादव, रवी सोळंके, तुकाराम सोळंके, सिद्धू केकान, मधुकर मोरे, कृष्णा टेकाळे, नंदू गांजे, बबलु सातपुते, नसरुल्ला काकड, गजानन लोणीकर, रमेश थोरात, आसेफ कच्छी, आबासाहेब तौर, डॉक्टर वाघमारे, डॉक्टर उमेर, भगवान कांबळे, राजेंद्र बाहेती, जिजा शिंदे यांची उपस्थिती होती.

उद्घाटन सोहळ्यात उपस्थित विद्यार्थ्यांना आणि पालकांना मार्गदर्शन करताना आमदार बबनराव लोणीकर यांनी शिक्षणाचे सामाजिक आणि वैयक्तिक जीवनातील महत्त्व विशद केले. ते म्हणाले, शिक्षण हीच खरी संपत्ती आहे, जी कधीच नष्ट होत नाही. ती माणसाला आत्मनिर्भर बनवते आणि समाजाला प्रगतीच्या शिखरावर नेऊन ठेवते.त्यांनी विद्यार्थ्यांना जीवनात यशस्वी होण्यासाठी निश्चित ध्येय, ठाम निर्धार आणि सतत प्रयत्न यांची गरज असल्याचे सांगितले. जीवनात अडचणी आणि आव्हाने ही येतच राहतात, परंतु त्या आव्हानांना सामोरे जाण्यासाठी संयम, मेहनत आणि निष्ठेची आवश्यकता असते. वादळे उठतील, पण झुंजत राहा. किनाऱ्याकडे लक्ष ठेवून नाव हाकत राहा. यश तुमचेच आहे, असे प्रेरणादायी उद्गार त्यांनी काढले. त्यांनी विद्यार्थ्यांना सांगितले की, सुख, शांती आणि समृद्धी ही यशातच दडलेली असते. त्यासाठी निष्ठा, मेहनत आणि कर्मकुशलता यांची एक अशी उंच शिडी तयार करा की, ती असीम आकाशालाही स्पर्श करेल.



लोणीकर यांनी शिक्षणाच्या माध्यमातून समाजात सकारात्मक बदल घडवण्याचा संदेश दिला. त्यांनी विघ्नहर्ता सेवाभावी संस्थेच्या या उपक्रमाचे कौतुक केले आणि अशा शैक्षणिक संस्थांमुळे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षणाची संधी मिळेल, असा विश्वास व्यक्त केला. त्यांनी शिक्षक आणि पालकांना आवाहन केले की, मुलांना केवळ पुस्तकी ज्ञानच नव्हे, तर मूल्यनिष्ठ आणि संस्कारयुक्त शिक्षण देऊन त्यांना सज्जन नागरिक बनवावे. विघ्नहर्ता सेवाभावी संस्था संचलित व्हिजन हॅली पब्लिक स्कूलच्या या शुभारंभाने आष्टी आणि परतूर परिसरात शिक्षणाच्या क्षेत्रात एक नवीन अध्याय सुरू झाला आहे. या शाळेच्या माध्यमातून ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना आधुनिक आणि दर्जेदार शिक्षण उपलब्ध होणार आहे. शाळेच्या उद्घाटनाने स्थानिक समुदायात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून, यामुळे शिक्षणाच्या नव्या संधी उपलब्ध होतील, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

**एअर इंडिया फ्लाइट दुर्घटनेतील मृतांना भावपूर्ण श्रद्धांजली**

या शुभारंभ सोहळ्याच्या वेळी, एका शोकदायी घटनेने सर्वांचे मन सुन्न झाले. एअर इंडिया फ्लाइट ख-१७१, जे १२ जून २०२५ रोजी अहमदाबाद येथून लंडनला जात होते, त्याचा मेघानी नगर परिसरात टेकऑफनंतर काही मिनिटांतच अपघात झाला. या बोईंग ७८७-८ ड्रीमलाइनर विमानात २४२ प्रवासी आणि क्रू मेंबर्स होते, ज्यामध्ये १६९ भारतीय, ५३ ब्रिटिश, ७ पोर्तुगीज आणि १ कॅनेडियन नागरिकांचा समावेश होता. या दुर्घटनेत गुजरातचे माजी मुख्यमंत्री विजय रुपाणी यांच्यासह अनेकांनी आपले प्राण गमावले. या दु:खद घटनेमुळे उद्घाटन सोहळ्याच्या उत्साहावरही परिणाम झाला. आमदार बबनराव लोणीकर यांनी या दुर्घटनेत मृत्युमुखी पडलेल्या सर्वांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पत केली. या दु:खद घटनेमुळे आम्ही शोकाकूल आहोत. मृतांच्या कुटुंबीयांच्या दुखात आम्ही सहभागी आहोत, असे भायवक उद्गार त्यांनी काढले. या शोकांतिकेच्या पार्श्वभूमीवर, त्यांनी उद्घाटन सोहळ्यात हार, फूल आणि अतिशबाजी नाकारली आणि कार्यक्रम शांततेत साजरा करण्याचा निर्णय घेतला. उपस्थित सर्वांनी दोन मिनिटांचे मौन पाळून मृतांना श्रद्धांजली वाहिली.

# महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक संघाचे राज्याध्यक्ष केशवराव जाधव यांची जालना जिल्ह्याला भेट



**जाफ्राबाद । प्रतिनिधी -** महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक संघाचे राज्य अध्यक्ष श्री केशवराव जाधव यांनी जालना जिल्हा येथे दिनांक १२/०६/२०२५ रोजी सायंकाळी धावती भेट दिली. यावेळी जालना जिल्ह्यातील शिक्षकांच्या अडचणी समजून घेतल्या तसेच राज्यस्तरावर संघटनेच्या वतीने कोणकोणत्या प्रश्नावर काम सुरू आहे याबाबत माहिती दिली. जालना जिल्ह्यामध्ये जिल्हाध्यक्ष श्री बाबासाहेब जुंबड यांच्या नेतृत्वाखाली प्राथमिक शिक्षक संघाच्या सुरू असलेल्या कार्याचे कौतुक केले. यावेळी प्राथमिक शिक्षक संघाचे पदाधिकारी श्री प्रमोद पवार यांना वाढदिवसानिमित्त शुभेच्छा दिल्या. यावेळी प्राथमिक शिक्षक संघाचे जिल्हा कार्यकारी अध्यक्ष श्री सुभाष भडांगे प्राथमिक शिक्षक संघाचे पदाधिकारी तथा जालना बदनापूर तालुका पतसंस्थेचे सचिव श्री गणेश भुतेकर तसेच जालना तालुका पदाधिकारी श्री प्रमोद पवार इत्यादी उपस्थित होते.

# उद्योग-व्यवसाय उभारणीसाठी सखोल माहितीचा वापर करावा - के. डी. दांडगे



**जालना । प्रतिनिधी -** मिटकॉन प्रशिक्षण केंद्र व उद्योजकता विकास विभाग यांच्या वतीने जालना येथे आज दि.१८ जुन २०२५ रोजी एक दिवशीय व्यावसायिक कार्यशाळा आयोजित करण्यात आली आहे. या कार्यशाळेत शासनाच्या विविध शासनस्तरावर असलेल्या कर्ज प्रकरणाच्या योजना याची सविस्तर उद्योग /व्यवसाय उभारणीसाठी सखोल माहितीचा वापर कसा करावा याची चर्चा होणार आहे.तसेच उद्योग संधी मार्गदर्शन, उद्योग प्रेरणा, संघटन कौशल्य, उद्योजकीय गुणसंपदा,व्यक्तीमत्व विकास, प्रभावी संभाषण कौशल्य, उद्योग व्यवस्थापन, जागेची निवड, बाजारपेठ पाहनीतंत्र, शासकीय व निमशासकीय योजना, जिल्हा उद्योग केंद्राच्या विविध योजना,खादीग्राम उद्योग मंडळाच्या योजना, महामंडळाच्या विविध योजना, राष्ट्रीय पशुधन विकास योजना,प्रकल्प अहवाल तयार करणे, कर्ज प्रस्ताव तयार करणे, बँकेची कार्यप्रणाली , विक्री व्यवस्था,भांडवल उभारणी ,मनुष्यबळ , विमा संरक्षण, शासकीय परवाने या विषयी मार्गदर्शन करण्यात आले आहे. अधिक माहिती व मार्गदर्शनासाठी के डी दांडगे मो.९४२३७३०९३२ येथे संपर्क साधावा असे आवाहन करण्यात आले आहे.

# मंठा शहरातील वॉर्ड क्रमांक दहामध्ये रस्त्याचे उदघाटन



**मंठा । प्रतिनिधी -** मंठा शहरातील वॉर्ड क्रमांक १० मध्ये माजी मंत्री तथा विद्यमान आमदार बबनरावजी लोणीकर यांच्या प्रयत्नातून नगरोत्थान निधी मधून ३० लक्ष रुपयाच्या रस्त्याचे उदघाट्न मंठा शहराचे कृ.उ.बाजार समितीचे संचालक तथा प्रथम नागरिक नगराध्यक्ष वैजनाथ बोराडे यांच्या हस्ते करण्यात आले यावेळी वॉर्ड क्रमांक १० चे नगरसेवक सचिन बोराडे, उपनगराध्यक्ष अरुण वाघमारे, मा.उपनगराध्यक्ष जे.के. कुरेशी , नगरसेवक उबेद बागवान, नगरसेवक राजेश खंदारे, नगरसेवक बाज पठाण, अभिजीत कोदंडे, आकाश कास्तोडे, कपिल तिवारी , मुकेश काऊतकर यांच्यासह वार्डातील नागरिकांची उपस्थिती होती.

# हजरत वस्तानवी यांच्या सेवांच्या सन्मानार्थ बैठक संपन्न

**परतूर । प्रतिनिधी -** जालना जिल्ह्यातील पारड गावातील मरकज मस्जिद येथे मौलाना नईम, नाझीम जामिया मिन्हाज-उल-उलूम रंजनी यांच्या मार्गदर्शनाखाली आणि नाझीम मदरसा अबी बिन काअब आष्टी, कारी शमसुद्दीन, यांच्या अध्यक्षतेखाली हजरत वस्तानवी यांच्या सेवांच्या सन्मानार्थ बैठक आयोजित करण्यात आली होती. या प्रसंगी मुफ्ती मुहम्मद बाबर कासमी, नाझीम जामिया रौजत-उल-उलूम, परतूर,मुफ्ती अब्दुल रहमान नायगावी, काझी शरीयत, जालना, मुफ्ती मुहम्मद फहीम अध्यक्ष जमिअत उलेमा शहर जालना, मुफ्ती अब्दुल कदीर, अध्यक्ष जमीअत उलेमा परतूर, मुफ्ती फारुख इमाम बिलाल मस्जिद जालना, कारी शकील, जामिया अकल कुनवाचे प्राध्यापक, हाफिज शकील, जामिया अबू हुरैराह बदनापूरचे प्राध्यापक, याशिवाय जामिया अकल कुंवाचे उलेमा आणि हुफ्फाज, आणि विद्वान उपस्थित होते. या बैठकीचे आयोजन फाजिल जामिया अकल कुंवा, पारडगाव, जिल्हा जालना यांनी केले होते. हजरत मौलाना वस्तानवी (अल्लाह दया) यांचे दिनांक ४ मे २०२५ रविवार रोजी अकल कुंणवा येथे निधन झाले होते. अल्लाहवर ते खूप विश्वास ठेवणारे, पैगंबरांचे खूप अनुयायी प्रेमी आणि धर्माच्या सेवेत अग्रेसर होते. त्यांचे जाणे हे मुस्लिम उम्मासाठी मोठे धार्मिक नुकसान आहे. अल्लाह सर्वशक्तिमान त्यांचे दर्जा उंचावे आणि आम्हाला त्यांच्या पावलावर पाऊल ठेवण्याची क्षमता देवो. अकल कुन्वा येथून पदवीधर झालेल्या विद्वानांनी मौलाना वस्तानवी यांच्यासाठी कबुली आणि स्वीकृती या विषयावर ही बैठक जालना जिल्ह्यातील पारडगावात आयोजित करण्यात आली होती.

बैठकीचे सुत्र संचालन शैखुल हदीस दारुल उलूम सेंधवा एम.पी. मुफ्ती मुहम्मद आदम यांनी पार पाडले.

मुफ्ती आदम यांनी जामिया अकल कुन्वाचे अध्यक्ष यांच्या सेवांवर प्रकाश टाकताना सांगितले की, गुलाम मुहम्मद वस्तानवी यांनी हलाखीच्या परिस्थितीतून जामिया अकल कुन्वाची स्थापना केली, शून्यातून एक विश्व निर्माण करून त्यांनी ते कशे विकसित केले, यावर प्रकाश टाकताना त्यांनी वस्तानवी यांना श्रद्धांजली वाहिली, आणि विद्वान आणि प्रतिष्ठित व्यक्तींना त्यांचे कार्य पुढे नेण्याची विनंती केली. या प्रसंगी जामिया मिन्हाज-उल उलूम रंजनीचे नाझिम-ए-आला, मौलाना नईमुद्दीन, रेल्वे स्टेशन मस्जिद जालनाचे इमाम मुफ्ती अब्दुल रहमान नायगावी, मदरसा रौजतुल उलूम पर तूरचे नाझिम मुफ्ती मुहम्मद बाबर कासमी, जमियत उलेमा जालनाचे शहराध्यक्ष मुफ्ती फहीम, मुफ्ती फारूक यांनी वस्तानवी यांच्या धार्मिक, राष्ट्रीय, शैक्षणिक, आर्थिक, सामाजिक, समकालीन, शाळा, मदरसे, मकातीब, मस्जिद, गरीब-अनाथ, लाचार, आणि इतर सर्व क्षेत्रात, मौलानांनी केलेल्या उत्कृष्ट कार्याचे स्मरण करून कौतुक केले, मौलानांनी अरबीक शिक्षणा सोबत विज्ञानाचा पाया घातला, मदरशांचा पाया घातला, त्यांनी मुस्लिम उम्मच्या तरुणांसाठी समकालीन विज्ञान संस्था स्थापन केल्या, मेडिकल सायन्स कॉलेज, एमबीबीएस कॉलेज, डी.एड कॉलेज, बी.एड कॉलेज, इंजिनिअरिंग कॉलेज, आयटी आय बीयूएमएस



कॉलेज, बीएचएमएस, नर्सिंग कॉलेज सुरू केले, त्यांनी धार्मिक शिक्षणासह, प्रोफेशनल शिक्षणाची व्यवस्था केली. मुलांच्या शिक्षणा सोबत मुलींच्या शिक्षणाची व्यवस्था केली, म्हणून हजरत यांच्या सेवेचे कार्य सतत मार्गक्रमण करत पुढे नेण्यासाठी आणि या छोट्या गावात, शिक्षण लोकप्रिय करण्यासाठी, सर्व उपस्थितांनी आपल्या मुलांना शिक्षणाशी जोडले पाहिजे. हीच खरी श्रद्धांजली मौलाना वस्तानवी यांच्यासाठी कबुली आणि श्रद्धा ठरेल, येथील अनेक विद्यार्थ्यांनी धार्मिक आणि समकालीन ज्ञान मिळविण्यासाठी अभिमानाने आपली नावे व्यक्त केली. शेवटी, जामिया मिन्हाज-उल-उलूम रंजनीचे नाझीम मौलाना नईमुद्दीन यांच्या सामूहिक प्रार्थनेनंतर या कार्यक्रमाची सांगता झाली.

## परतूर तालुक्यातील आष्टी गावात १३५७ लाभार्थ्यांना प्रधानमंत्री आवास योजना अंतर्गत आमदार बबनराव लोणीकर यांच्या हस्ते मंजुरी आदेश वाटप

# अकरा वर्षाच्या कार्यकाळात केंद्र सरकारने राबविलेल्या विविध योजने मूळे देशभरातील २५ कोटी नागरिकांनी दारिद्र्यरेषा ओलांडली - आमदार लोणीकर

**परतूर । प्रतिनिधी -** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृ सरकारने २०१४ ते २०२५ या कालावधीत गरीब कल्याणासाठी उल्लेखनीय कामगिरी केली आहे. प्रधानमंत्री आवास योजने अंतर्गत ४ कोटींहून अधिक कुटुंबांना पक्की घरे मिळाली, ज्यामुळे त्यांचे राहणीमान सुधारले. प्रधानमंत्री गरीब कल्याण अन्न योजने द्वारे ८१ कोटी नागरिकांना मोफत अन्नधान्य पुरवठा करून अन्नसुरक्षा सुनिश्चित केली गेली. आयुष्मान भारत योजने अंतर्गत ५५ कोटी नागरिकांना दरवर्षी ५ लाख रुपयांपर्यंत मोफत वैद्यकीय उपचार मिळाले, ज्यामुळे गरीबांना मोठ्या आजारांवर उपचाराची सुविधा उपलब्ध झाली. यामुळे २५ कोटींहून अधिक नागरिकांनी दारिद्र्यरेषा ओलांडली. या कल्याणकारी योजना, कौशल्य विकास, आणि आर्थिक समावेशनामुळे लाखो लोकांचे जीवनमान उंचावले आणि सामाजिक-आर्थिक विकासाला चालना मिळाली, असे माजी मंत्री आणि परतुरचे आमदार बबनराव लोणीकर यांनी नमूद केले.

ऊर्जा विभाग आणि महावितरण यांच्या संयुक्त विद्यमाने प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजना अंतर्गत हर घर सोलार योजनेचा शुभारंभ आणि प्रधानमंत्री आवास योजना - ग्रामीण (झचध-ऋ) अंतर्गत १३५७ लाभार्थ्यांना मंजुरी आदेशांचे वाटप सोहळा १२ जून २०२५ रोजी खंडेश्वर मंदिर, आष्टी येथे अतिशय उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. या कार्यक्रमाचे उद्घाटन आणि मंजुरी आदेशांचे वाटप मा. श्री. बबनराव लोणीकर माजी मंत्री आणि आमदार, महाराष्ट्र राज्य यांच्या शुभहस्ते पार पडले. या प्रसंगी उपस्थित आष्टी व आष्टी सर्कल मधील हजारो लाभार्थी महिला पुरुषांना मार्गदर्शन करताना ते बोलत होते.

या प्रसंगी व्यास पिठावर भाजपा परतूर तालुका अध्यक्ष शत्रूघण कणसे, रमेश भापकर, तुकाराम सोळंके, गजानन लोणीकर, रवी सोळंके,सिद्धू केकाण, बाळासाहेब लहाने, रंगनाथ येवले, बाबाराव थोरात, सुदाम प्रधान, कृष्णा टेकाळे, रामदास काका सोळंके, मोहम्मद जमीनदार, राजेंद्र बाहेती, प्रदीप ढवळे, विष्णूपंत शहाणे, अमोल जोशी, भगवान कांबळे, संजय सदग अधीक्षक अभियंता महावितरण, पद्माकर गायकवाड उपविभागीय अधिकारी परतूर, श्रीमती प्रतिभा गोरे तहसीलदार परतूर, उदयसिंग राजपूत उप मुख्य कार्यकारी अधिकारी, पंचायत जि.प. जालना, एस.बी. मठपती कार्यकारी अभियंता महावितरण, राजेश तांगडे गटविकास अधिकारी परतूर, राधेश्याम कुमावत सहायक अभियंता महावितरण यांची उपस्थिती होती.

केंद्र व राज्य सरकारच्या विविध योजनांबद्दल सविस्तर माहिती दिली. त्यांनी सौरऊर्जेच्या महत्त्वावर प्रकाश टाकत, या योजनेद्वारे वीज बिल कमी करणे, पर्यावरण संरक्षण, आणि स्थानिक स्तरावर रोजगार निर्मितीला चालना मिळेल, असे प्रतिपादन केले. तसेच, झचध-ऋ योजनेअंतर्गत ग्रामीण भागातील गरजूंना पक्की घरे मिळणे हे सामाजिक समतेच्या दिशेने टाकलेले महत्त्वपूर्ण पाऊल असल्याचे त्यांनी नमूद केले.

हा कार्यक्रम जालना जिल्ह्यात नवीकरणीय ऊर्जा आणि ग्रामीण गृहनिर्माणाला प्रोत्साहन देण्याच्या केंद्र आणि राज्य सरकारच्या वचनबद्धतेचे प्रतीक ठरला. महावितरण आणि स्थानिक प्रशासनाच्या सहकार्याने या योजनांची प्रभावी अंमलबजावणी होत आहे. माजी मंत्री, आमदार बबनराव लोणीकर यांच्या प्रेरणादायी मार्गदर्शनामुळे लाभार्थ्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले.

या वेळी पुढे बोलतांना आमदार बबनराव लोणीकर यांनी प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण भागातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांना पक्की घरे बांधण्यासाठी आर्थिक सहाय्य प्रदान करते. जालना जिल्ह्यात परतूर तालुक्यातील आष्टी या गावात १,३५७ लाभार्थ्यांना माजी



मंत्री आमदार बबनराव लोणीकर यांच्या शुभहस्ते मंजुरी आदेशांचे वाटप करण्यात आले, जे ग्रामीण गृहनिर्माणाच्या प्रगतीचे द्योतक आहे. या योजने अंतर्गत घरांचा किमान आकार २५ चौरस मीटर असून, स्वच्छ अन्न शिजवण्यासाठी समर्पित क्षेत्राचा समावेश असल्याचे नमूद केले.

पुढे बोलतांना आमदार बबनराव लोणीकर म्हणाले कीपंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी १३ फेब्रुवारी २०२४ रोजी प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजना चालू केली. या योजने अंतर्गत १ कोटी कुटुंबांना दरमहा ३०० युनिट मोफत वीज पुरवण्यासाठी रूफटॉप सोलर पॅनेल बसवण्याचे उद्दिष्ट आहे. योजनेचा उद्देश सौरऊर्जेचा वापर वाढवणे, वीज बिल कमी करणे, आणि पर्यावरण संरक्षणाला चालना देणे आहे. लाभार्थ्यांना थेट बँक खात्यात अनुदान आणि सोलर पॅनेल बसवण्यासाठी स्वस्त बँक कर्ज उपलब्ध आहे. सदर योजना सर्व घरकुल योजनेत या योजनेचा समावेश असून घरकुल असं मिळणाऱ्या एक लाख दहा हजार रुपये अनुदानातून याकरिता १५ हजार रुपयाची तरतूद करण्यात आली आहे. प्रत्येक घरावर सोलर बसविण्याचा योजने करता राज्य सरकार प्रति लाभार्थी ३० हजार रुपये अनुदान देत आहे.

या कार्यक्रमाच्या यशस्वीते करीता आष्टी चे सरपंच मधुकर मोरे उपसरपंच नसरूल्हा काकड, बबलू सातपुते, अमोल मोरे, अनंता आगलावे, सईद शेख, रफिक राज, असेफ कच्छी, आफताब कुरेशी सर्व ग्रामपंचायत सदस्य आणी ग्रामविकास अधिकारी डी बी काळे यांनी प्रयत्न केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री सर गांजाळे यांनी केले.

# आनंदी जीवनासाठी ब्रह्माकुमारीजतर्फे जालन्यात ३ दिवशीय निशुल्क शिबिर

## प्रेरणादायी वक्ते व प्रशिक्षक प्रो. गिरीश करणार मार्गदर्शन

**जालना । प्रतिनिधी -** ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालयाच्यावतीने जालन्यात १४ ते १६ जूनदरम्यान आनंदी जीवन कसे जगावे या विषयावर तीन दिवसीय निशुल्क शिबिराचे आयोजन करण्यात आले असून, त्यात सुप्रसिद्ध प्रेरणादायी वक्ते व प्रशिक्षक प्रो. ई. व्ही. गिरीश (मुंबई) यांचे मार्गदर्शन लाभणार आहे.

मंठा चौफुलीवरील प्रियंका रेसिडेन्सीमधील ब्रह्मकुमारी ईश्वरीय विश्वविद्यालयाच्या राजयोग भवनात दररोज सायंकाळी ७ ते ८ या होणाऱ्या या शिबिराचा शुभारंभ १४ जून रोजी सायंकाळी ६.३० वाजता महाराष्ट्र राज्य अंदाज समितीचे अध्यक्ष आ. अर्जुनराव खोतकर यांच्या हस्ते होणार असून, प्रमुख पाहुणे म्हणून पोलाद स्टीलचे व्यवस्थापकीय संचालक कश्मिरीलाल अग्रवाल आणि दैनिक आनंदनगरीचे संपादक शिवरतन मुंदडा यांची उपस्थिती राहणार आहे.

शिबिराच्या पहिल्या दिवशी प्रो. ई. व्ही. गिरीश हे 'तणाव जीवनातील सर्वात मोठी अडचण' या विषयावर मार्गदर्शन करणार असून, दुसऱ्या दिवशी 'स्वतःमधील हिरोला ओळखण्याचा मंत्र' देणार आहेत तर तिसऱ्या दिवशी 'राजयोग मेडिटेशनच्या आधारे आत्मिक परिवर्तन' साधण्याच्या उपायांवर चर्चा होईल. तसेच याच विषयावर हे एक दिवशीय शिबिर १५ जून रोजी परतुर येथे सकाळी ९ ते ११ तर १६ जून रोजी अंबड येथे सकाळी ९ ते ११ या वेळेत होणार आहे.

प्रो. ई. व्ही. गिरीश हे मागील १८ वर्षांपासून ब्रह्माकुमारी संस्थेशी जोडले गेलेले असून, देशभरातील विविध नामांकित संस्था, शासकीय व खासगी कार्यालये, शिक्षण संस्था तसेच सुरक्षादल यामध्ये मनःशांती, आत्मबळ आणि नेतृत्व विकासावर हजारो लोकांना प्रभावी मार्गदर्शन त्यांनी केले आहे. सायको-नेरोबिक्स (अप्लाइड सायकोलॉजी) या विषयात त्यांनी पदविका घेतलेली असून, मार्केटिंग व फायनान्समध्ये त्यांनी एमबीए केले आहे. त्यांच्या सहज, प्रभावी आणि अनुभवसंपन्न शैलीमुळे श्रोत्यांवर खोल परिणाम होतो.

जीवनात बदल घडवून आणण्यासह स्वतः ला नव्याने ओळखण्यासाठी आणि एक सकारात्मक जीवनशैली स्वीकारण्यासाठी ही एक अनमोल संधी असून, जालन्यातील नागरिकांनी या उपक्रमात मोठ्या संख्येने सहभागी व्हावे आणि अधिक माहितीसाठी लक्ष्मीनारायण मानधना ९४२२७२४३२८, कल्पना लाहोटी ८८३०९३६०८०, डॉ. सतीश मोरे ९४२२२१६७०३, भारती मोरे ७७६९०४६००४, सुनील लाहोटी ९४२३६६२८८८, वीणा साबू ९४२२२१६७१७ यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

# शिक्षकांच्या सेवेमधील वरिष्ठ श्रेणी व निवड श्रेणी प्रशिक्षण शिक्षक सक्षमीकरणासाठी आहे - नारायण पिंपळे

**विशाल देशमुख**

**टेंभूर्णी -** जालना जिल्ह्यामध्ये महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन परिषद पुणे व जालना जिल्हा शिक्षक व प्रशिक्षण संस्था जालना यांच्या संयुक्त विद्यमाने इयत्ता पहिली ते बारावी पर्यंतच्या शिक्षकांना ज्यांची बारा वर्षे व २४ वर्षे सेवा झालेली आहे अशांना वरिष्ठ व निवड श्रेणी प्रशिक्षण देण्यात येत होते. दिनांक २ जून ते १२ जून पर्यंत हे प्रशिक्षण जालना जिल्ह्यातील पाच केंद्रावर देण्यात आले. जाफराबाद तालुक्यासाठी असलेले केंद्र श्रीमती जेबीके विद्यालय नवभारत कनिष्ठ महाविद्यालय टेंभुर्णी येथे हे प्रशिक्षण केंद्र होते. या प्रशिक्षण केंद्रावर जवळजवळ शंभर शिक्षकांना हे प्रशिक्षण देण्यात आली. दोन गटांमध्ये या प्रशिक्षणाची नियोजन करण्यात आले होते. या प्रशिक्षण केंद्राचे प्रमुख म्हणून डॉक्टर भरत सूर्यवंशी होती. व या केंद्रावर गटसाधन केंद्राचे प्रमुख नारायण पिंपळे, प्राध्यापक दत्ताजीराव देशमुख टेंभुर्णीकर, डॉक्टर आनंद जाधव, तंत्रस्नेही सुलभ पंजाबराव दांदडे, अंभोरे सर, दाभाडे सर, गटसाधन केंद्राचे आल्हाट सर चव्हाण सर ओव्हाळ सर, बीटी शिंदे सर, तांत्रिक सहाय्यक म्हणून भानुसे सर, बिसेन सर, आदींनी सुलभकाची भूमिका निभावतांनाच वरिष्ठ व निवड श्रेणी शिक्षकांना प्रशिक्षण दिले. या प्रशिक्षणाचा समारोप १२ जून रोजी संपन्न झाला. या प्रशिक्षणाच्या प्रमुख पदावरून बोलताना नारायण पिंपळे यांनी शिक्षकांनी घेतलेले हे प्रशिक्षण त्यांच्या पुढील शिक्षकी पेशेसाठी सक्षमीकरणासाठी आवश्यक असून आपल्या समोरील विद्यार्थ्यांना वेगळ्या पद्धतीचे शिक्षण देऊन जागतिक दर्जाचा विद्यार्थी बनवण्यासाठी हे प्रशिक्षण आवश्यक आहे आणि त्यासाठी त्यांनी उत्कृष्टपणे प्रशिक्षण घेतल्याबद्दल प्रशिक्षण देणाऱ्यांची आभार मानले. या कार्यक्रमाचे नियोजन सपकाळ सर व आहेर सर यांनी केले. या प्रशिक्षणामध्ये प्रशिक्षणार्थ्या तर्फे मनोगती व्यक्त करण्यात आली. त्यामध्ये बरंडवाल मॅडम,पडघन मॅडम, मोहर मॅडम, डॉक्टर राजपूत, सुनील बनसोडे, कोतवाल सर, प्रकाश निकम सर, आधी प्रशिक्षणार्थ्यांनी आपली मनोगति व्यक्त करतानाच प्रशिक्षणातून घेतलेलं ज्ञान हे आम्ही विद्यार्थ्यांपर्यंत आवश्यक पोहोचू



तसेच आमच्या सक्षमीकरणासाठी हे प्रशिक्षण उपयुक्त होते असेही त्यांनी सांगितले. सकाळी नऊ वाजले पासून संध्याकाळच्या साडेपाच वाजेपर्यंत आम्ही प्रशिक्षणासाठी उपस्थित होतो आणि प्रशिक्षण देणारे सुद्धा पावणे नऊ पासून उपस्थित होते हे सुद्धा आवर्जून त्यांनी आपल्या भाषणांमधून सांगितले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सुलभक्तता राज्य प्रशिक्षक प्राध्यापक दत्ताजीराव देशमुख हे होते. त्यांनी आपल्या भाषणात सांगितले की राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० हे सकारात्मक दृष्ट्या विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचण्यासाठी आपण ही आता सज्ज झालं पाहिजे. तसेच शिक्षकांनी विद्यार्थ्यांसमोर जाताना सकारात्मक दृष्टिकोन ठेवून विद्यार्थ्यांमध्ये शैक्षणिक दर्जा निर्माण करावा आणि जागतिक दर्जाचा विद्यार्थी निर्माण करण्यासाठी आपण पुढाकार घेतला पाहिजे ही भूमिका त्यांनी विशद केली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन दिलीप सपकाळे यांनी केले तर आभार प्रदर्शन आहेर सर यांनी मांडले. उत्तर चाचणीनंतर या प्रशिक्षणाची सांगता झाली.






हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282 Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886 E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.